# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१८/५४ दिनांक: १६ जुलै २०१८

या अधिसूचनेद्वारा सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित निवडणूकीबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिका क्रमांक ९३८/२०१८ संदर्भात दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य पदांसाठी अधिसभेच्या सदस्यांमधून होणाऱ्या निवडणूकीसंबंधी Status-Quo असा अंतरिम आदेश दिला होता. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने, दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित अधिसूचनेनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेतील निवडणूकविषयक बाब क्रमांक २ आणि नामनिर्देशनविषयक बाब क्रमांक ३ ते ७ पर्यंतच्या बाबी सुध्दा स्थगित ठेवण्यात आल्या होत्या. याबाबतची अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/ २०१८/४५, दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आली होती.

दिनांक ३ जुलै २०१८ रोजी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाद्वारे पारित आदेशान्वये वरील याचिका क्रमांक ९३८/२०१८ **Dispose of** करण्यात आलेली आहे. सदर याचिका **Dispose of** झाल्यामुळे, दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेतील बाब क्रमांक २, तसेच बाब क्रमांक ३ ते ७ पर्यंतच्या स्थगित बाबींसाठी अधिसभेची स्थगित सभा मा. कुलगुरूंच्या निर्देशान्वये दिनांक २४ जुलै २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेत कार्यक्रमपत्रिकेतील बाब क्रमांक २ मध्ये नमूद गटांची निवडणूक दुपारी १२.०० ते १.०० या कालावधीत घेण्यात येईल. तसेच बाब क्रमांक ३ ते ७ संबंधातील नामनिर्देशपत्र भरण्याचे व नामनिर्देशनपत्र आणि उमेदवारी मागे घेण्याचे सूचनापत्र सभागृहात पूरविण्यात येईल.

तसेच, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य पदांसाठी अधिसभेच्या सदस्यांमधून होणाऱ्या निवडणूकीविषयी दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित अधिसूचनेनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या अधिसभेच्या कार्यक्रमपत्रिकेतील बाब क्रमांक २ मध्ये नमूद निवडणूकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती, तीच यादी दिनांक २४ जुलै २०१८ रोजी आयोजित निवडणूकीसाठी कायम ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार नव्याने नामनिर्देशित झालेल्या सदस्यांची नावे दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीत अंतर्भूत करून व ज्या सदस्यांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे अशा सदस्यांची नावे यादीतून वगळून आता अद्ययावत मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली असून सदर यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आणि Election 2017 या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली आहे, याची कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(डॉ. नीरज खटी)
प्रभारी कुलसचिव व
निवडणूक निर्णय अधिकारी

प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:

१. विद्यापीठ अधिसभेचे सर्व सन्मानीय सदस्य.
२. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
४. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.) (अति. प्रभार) व
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी